## जागतिक आरोग्य संघटना (WHO - World Health Organization)

- पहिल्या महायुद्धानंतर WHO ही 'आरोग्य संघटना' या नावाने League of Nations ची एक संस्था होती.
- WHO हे आंतरराष्ट्रीय स्तरावर सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात काम करणारे संयुक्त राष्ट्राचे (UN) एक विशेषीकृत अभिकरण आहे. WHO ही UN ची पहिली संलग्न संस्था आहे.
- WHO ही UN च्या आर्थिक व सामाजिक परिषदेच्या अधिनस्थ काम करते (ECOSOC). WHO ही ECOSOC ची विशेष पण साहाय्यकारी नसलेली (Specialized But not Subsidiary) संस्था आहे. तसेच WHO ही UN Development Group ची सदस्य संस्था आहे.
- WHO स्थापन करण्याचा निर्णय ECOSOC च्या July 1946, New York येथील आंतरराष्ट्रीय आरोग्य परिषदेमध्ये झाला. Andrija Stamper हे WHO चे पहिले अध्यक्ष होय.
- WHO ची स्थापना 7 एप्रिल 1948 रोजी झाली. भारत WHO चा संस्थापक सदस्य आहे.
- WHO ची घटना 22 जुलै 1946 रोजी स्वीकृत केली. UN च्या तत्कालीन सर्वच 61 राष्ट्रांनी WHO च्या घटनेवर स्वाक्षरी केली. प्रत्येक सदस्य राष्ट्राने WHO च्या स्थापनेला मान्यता दिली.
- 1949 मध्ये WHO चे दक्षिण आशिया प्रादेशिक कार्यालय नवी दिल्ली येथे स्थापन.
- WHO चा स्थापना दिवस 7 एप्रिल हा जागतिक आरोग्य दिन 1950 पासून दरवर्षी साजरा केला जातो. WHO चे मुख्यालय स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे आहे.
- सद्यस्थितीतील WTO चे 194 देश सदस्य आहेत.
- WHO च्या घटनेनुसार संघटनेचे उद्दिष्ट – सर्व व्यक्तींसाठी आरोग्याचा शक्य तितका उच्चतम स्तर प्राप्त करणे.
- WHO च्या घटनेनुसार, आरोग्य या शब्दाचा अर्थ – आरोग्य म्हणजे केवळ आजाराचा अभाव नव्हे तर लोकांची शारीरिक, मानसिक, सामाजिक सुस्थिती म्हणजे आरोग्य होय.
- WHO चे सर्वोच्च तत्त्व 'मानवतावादी साहाय्य' करणे हे आहे. याचा उद्देश जागतिक स्तरावर उपचारात्मक व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा देणे हा आहे.
- WHO हे जागतिक पातळीवर औषध उत्पादनाचे मानांकन ठरवते. तसेच रोगांचे निदान पद्धती व निदानासाठी लागणाऱ्या उत्पादनांचा विकास करते.
- WHO दरवर्षी 2 अहवाल जाहीर करते.

- ➢ जागतिक आरोग्य अहवाल (World Health Report)
- ➢ जागतिक आरोग्य सर्वेक्षण (World Health Survey)

- इतर वार्षिक प्रकाशन
  - ➢ Bulletin of WHO
  - ➢ Human Resource for Health
  - ➢ Eastern Mediterean Health Journal
- 2018 च्या जागतिक आरोग्यविषयक अहवालाचा विषय – Depression : Lets Talk
- **WHO – अजेंडा**
  - ➢ **विकासाला प्रोत्साहन (Promoting Development)**
    - ➢ आरोग्य हा सामाजिक, आर्थिक विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण घटक.
    - ➢ आरोग्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक होत आहे.
    - ➢ जीवन वाचविणाऱ्या अथवा आरोग्याला प्रोत्साहित करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला संधी नाकारली जाऊ नये.
    - ➢ गरीब, दुर्बल घटकांच्या आरोग्यास प्राधान्य.
    - ➢ सहस्त्र विकास लक्ष्य (MDG) साध्य करणे, जुनाट आजारांचा नायनाट, दुर्लक्षित उष्ण कटिबंधीय रोगांचा प्रश्न हाताळणे.
  - ➢ **आरोग्य सुरक्षितता वाढविणे (Fostering Health Security)**
    - ➢ आरोग्य सुरक्षेला महत्त्वाचा धोका नवीन साथीच्या रोगांपासून आहे.
    - ➢ 2007 मध्ये WHO मार्फत सुधारित International Health Regulations अमलात आणली गेली. तेव्हापासून अशा साथीच्या रोगांना तोंड देण्याची जगाची क्षमता वाढलेली आहे.
  - ➢ **आरोग्य व्यवस्थांचे बळकटीकरण (Strengthening Health System)**
    - ➢ पुरेसा योग्य प्रशिक्षित स्टाफ/कर्मचारी वर्ग पुरविणे.
    - ➢ पुरेशी आर्थिक तरतूद, तंत्रज्ञान, आरोग्यविषयक माहिती गोळा करण्यासाठी सक्षम व्यवस्था निर्माण करणे.
  - ➢ **संशोधन, माहिती, पुरावे**
    - ➢ अधिक आरोग्यविषयक माहिती जमा करणे, निर्माण करणे, त्यांचा वापर करून मानके व मापदंड हे आरोग्याच्या क्षेत्रात ठरवणे.
    - ➢ पुराव्यांच्या आधारावर आरोग्यविषयक धोरणांची बांधणी करता येते.
    - ➢ वैश्विक आरोग्य स्थितीचे आकलन करता येते.
  - ➢ **भागीदारी भक्कम करणे (Enhancing Partnership)**
    - ➢ आरोग्य क्षेत्रात अधिक चांगले काम करण्यासाठी WHO जागतिक व स्थानिक पातळीवरील विविध क्षेत्रांतील संस्था, संघटना, अभिकरणे यांच्यासोबत भागदारी वाढवण्याचा प्रयत्न करते.
  - ➢ **कार्य सुधारणा (Improving Performance)**
    - ➢ WHO आपली कार्यक्षमता आणि परिणामकारकता वाढविण्यासाठी सतत प्रयत्नशील असते.
    - ➢ आरोग्याबाबत जागृती निर्माण होईल अशा सर्व कार्यक्रमांना WHO मार्फत प्रोत्साहन दिले जाते.
- **WHO ची रचना**
  - ➢ WHO ची सध्या सदस्यसंख्या 194 इतकी आहे.
  - ➢ WHO ची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था म्हणजे जागतिक आरोग्य सभा (World Health Assembly) होय.
    - ➢ ही सभा WHO चे कायदे करणारी सर्वोच्च संस्था आहे. दरवर्षी मे महिन्यात ही सभा भरते.
    - ➢ प्रत्येक सदस्य राष्ट्र कमाल तीन प्रतिनिधी या सभेवर पाठवते, त्यापैकी एकास प्रमुख प्रतिनिधी म्हणून दर्जा दिला जाईल.
    - ➢ **परिषदेची कार्ये**
      - ▶ संघटनेचे धोरण ठरविणे.
      - ▶ महासंचालकाची नेमणूक 5 वर्षांसाठी करणे.
      - ▶ संघटनेच्या बजेटला मान्यता देणे.
      - ▶ कार्यकारी मंडळाच्या कामांचे परीक्षण करणे.
      - ▶ या परिषदेला आरोग्याशी संबंधित करार करण्याचा किंवा नियमने स्वीकारण्याचा अधिकार आहे. राष्ट्राच्या सदस्यत्वाला मान्यता देणे.
  - ➢ **कार्यकारी मंडळ**
    - ➢ हे मंडळ 34 सदस्यांचे असते.
    - ➢ हे सदस्य 3 वर्षांच्या कालावधीसाठी 34 सदस्य राष्ट्रांकडून नियुक्त केले जातात.
    - ➢ मंडळ आपल्या सदस्यांमधून एकाची निवड अध्यक्ष म्हणून करतात.
    - ➢ मंडळाच्या वर्षातून 2 सभा होतात.
    - ➢ आरोग्य परिषदेच्या निर्णय व धोरणे यांची अंमलबजावणी करण्याचे काम कार्यकारी मंडळ करते.
  - ➢ **सचिवालय**
    - ➢ सचिवालयामध्ये महासंचालक व तांत्रिक, प्रशासकीय कर्मचारी यांचा समावेश होतो.
    - ➢ महासंचालक हे WHO चे प्रमुख तांत्रिक व प्रशासकीय अधिकारी असतात.

- ➤ महासंचालक यांची नेमणूक जागतिक आरोग्य परिषदेमार्फत कार्यकारी मंडळाच्या शिफारशीनुसार होते.
- ➤ सुमारे 8,000 आरोग्य व इतर तज्ञांचा स्टाफ WHO च्या दैनंदिन कामकाजात मदत करतो.

- **WHO ची विभागीय कार्यालये (Regional Offices)**
  (1) आफ्रिका प्रदेश : ब्राझविले, कांगो.
  (2) अमेरिकन प्रदेश : वॉशिंग्टन डीसी (USA)
  (3) युरोप प्रदेश : कोपेनहेगन, डेन्मार्क
  (4) दक्षिण-पूर्व आशिया : नवी दिल्ली, भारत
  (5) भूमध्यसागरी प्रदेश : नस्त्र सिटी कैरो (इजिप्त)
  (6) पश्चिम पॅसिफिक प्रदेश : मनिला फिलिपाईन्स.
  - ➤ प्रत्येक सभासद देश आणि बाह्य देणगीदार यांच्या मदतीतून WHO ला वित्तीय पुरवठा होतो.
  - ➤ WHO चे महासंचालक 2006-2017 या काळात मागरिट चॅन हे होते. 1 जुलै 2017 पासून WHO चे महासंचालक टेडरॉस ॲधोनॉम (Tedros Adhanom) हे पुढील 5 वर्षांसाठी आहेत.
  - ➤ HIV/AIDS बाबत WHO व UNAIDS नेटवर्क यांनी मिळून 3 by 5 Target हा उपक्रम राबविला.
  - ➤ WHO ने 1950 मध्ये क्षयरोग नियंत्रणासाठी BCG लसीचा वापर करण्यास सुरुवात केली.
  - ➤ WHO ने 1955 मध्ये हिवताप निमूर्लन कार्यक्रम हाती घेतला.
  - ➤ 1980 मध्ये WHO ने देवी रोगाचे संपूर्ण जगातून उच्चाटन झाल्याचे घोषित केले. मानवी प्रयत्नातून निर्मूलन झालेला देवी हा पहिला रोग ठरला.
  - ➤ 1988 मध्ये WHO ने पोलिओ निर्मूलन मोहीम सुरू केली. अफगाणिस्तान, पाकिस्तान व नायजेरिया हे 3 देश वगळता जगातून पोलिओचे निर्मूलन झाले आहे.
  - ➤ WHO ने 1986 मध्ये जागतिक स्तरावर AIDS नियंत्रण कार्यक्रम हाती घेतला. WHO ने 2002 मध्ये AIDS, क्षयरोग, हिवतापविरोधात लढण्यासाठी जागतिक निधी उभारला आहे.

- Country Cooperation Strategy (CCS)
  - ➤ आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय आणि WHO यांच्या संयुक्त विद्यमानाने CCS 2012-2017 या कालावधीत राबविण्यात आला.
  - ➤ त्यासाठी 3 धोरणे व 8 मुद्दे विचारात घेण्यात आली होती.
    - ➤ **धोरण प्राधान्य 1**
      - ▶ आंतरराष्ट्रीय आरोग्य मानके.
      - ▶ औषध निर्माण क्षेत्र बळकटीकरण, औषध नियंत्रण व व्यापार.
      - ▶ भारतीय आरोग्य व्यवस्थेचा दर्जा सुधारणे.
    - ➤ **धोरण प्राधान्य 2**
      - ▶ वैश्विक आरोग्य सेवा पोहोच.
      - ▶ आरोग्य सेवा विवरण.
    - ➤ **धोरण प्राधान्य 3**
      - ▶ RMNCH+A चे दर्जावर्धन.
      - ▶ संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोग.
      - ▶ WHO च्या सेवांचे हस्तांतरण

## आरोग्यासाठी कार्यरत संस्था/विभाग

**युनिसेफ (UNICEF - United Nations International Children's Emergency Fund)**

- UNO च्या सर्वसाधारण सभेने 11 डिसेंबर 1946 या दिवशी दुसऱ्या महायुद्धात विध्वंस झालेल्या देशांमधील बालकांना अन्न व आरोग्याच्या सुविधा पुरविण्यासाठी हा निधी उभारला. पुढे 1953 UN च्या आमसभेने या संस्थेचे United Nations Children Fund असे नामांतर केले मात्र त्याचे संक्षिप्त रूप युनिसेफ (UNICEF) हेच ठेवले. युनिसेफ ही UN ची विशेषीकृत संस्था आहे. युनिसेफला UN च्या स्रोतापैकी 2/3 वाटा मिळतो. युनिसेफ - भारत ही UN ची भारतातील काम करणारी सर्वांत मोठी संस्था आहे.
- युनिसेफचे मुख्यालय न्यूयॉर्क येथे असून दक्षिण आशियासाठीचे प्रादेशिक कार्यालय काठमांडू (नेपाळ) येथे आहे.
- Ludwik Rajchman हा Unicef ची स्थापना करणारा व्यक्ती असून पुढे तोच पहिला Unicef चा चेअरमन झाला.
- **Unicef ची कार्ये**
  - ➤ बालकांच्या हक्कांचे रक्षण करणे.
  - ➤ बालक माता यांचे आरोग्य व पोषण.
  - ➤ HIV बाधित माता व बालक यांना उपचार.
  - ➤ बालकांचे शिक्षण, लैंगिक समानता, लसी यासाठी प्रयत्न करणे.
  - ➤ UNICEF व अन्न कृषी संघटना (FAO) यांचा बालकांसाठी 1963 पासूनचा एक संयुक्त उपक्रम - उपयोजित पोषक आहार.
  - ➤ GOBI - बाल आरोग्य क्रांती घडवून आणण्यासाठी UNICEF चा हा कार्यक्रम हाती घेतला.

- G -Growth Charts : बालकांचा विकास मोजणे.
- O - Oral Rehydration : बालकांमधील निर्जलीकरण रोखणे.
- B - Breast Feeding : स्तनपान प्रोत्साहन.
- I - Immunisation : सार्वत्रिक लसीकरण.

**फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया – 4 मार्च 1948**

- फार्मसी अधिनियम 1948 नुसार Pharmacy Council of India ची स्थापना करण्यात आली.
- देशातील औषधनिर्माण शिक्षणाचे नियमन करणे.
- देशात फार्मासिस्ट व्यावसायिकांना व्यवसायासाठी मान्यता देणे.

**Dental Council of India**

- Dentist Act 1948 अंतर्गत Dental Council of India या संस्थेची स्थापना करण्यात आली.
- दंतविषयक शिक्षण व व्यवसाय यांचे नियमन करण्याचे काम ही परिषद करते.

**Indian Nursing Council**

- Indian Nursing Council Act 1947 नुसार या परिषदेची स्थापना झाली.
- परिचारिका, दायीं व आरोग्यसेविका यांचे शिक्षण, प्रशिक्षण व अभ्यासक्रम यांचे नियमन करणे.

**महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (Maharashtra Medical Council (MMC)**

- 1912 मध्ये महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ही देशातील सर्वांत जुनी वैद्यकीय परिषद आहे. ही संस्था म्हणजे पूर्वीच्या बॉम्बे वैद्यकीय परिषदेची वारस संस्था आहे.
- 1965 : महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम यानुसार ही वैधानिक संस्था स्थापन करण्यात आली.
- महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे प्रमुख काम म्हणजे वैद्यकीय पदवीधरांची नावनोंदणी करणे हे आहे.
- वैद्यकीय नीतितत्त्वांची जपणूक व पाठपुरावा करणे याची जबाबदारी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची आहे.
- वैद्यकीय कार्यावर दुर्लक्ष, पेशंटला चुकीची वागणूक, अवास्तव फी आकारणी इत्यादी बाबत डॉक्टरविरोधात तक्रारी या परिषदेकडे करता येतात.
- MMC ला गुन्हा/तक्रार दाखल झालेल्या डॉक्टरांविरोधात कारवाई/शिक्षा करण्याचे अधिकार असून ती न्यायव्यवस्थेसारखे कार्य करते.

**हाफकिन संस्था (1899 – मुंबई)**

- डॉ. वाल्डेमर हाफकिन हे मूळचे रशिया येथील होते.
- ते 1892 मध्ये भारतात कॉलराच्या साथीचे निर्मूलन करण्यासाठी कोलकाता येथे आले.
- 1896 मध्ये प्लेगची साथ आल्यावर त्यांना मुंबई येथे प्लेग संशोधन प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी निमंत्रित केले गेले.
- 1925 मध्ये याच प्रयोगशाळेचे रूपांतर हाफकिन संस्थांमध्ये करण्यात आले.

**रॉकफेलर फाउंडेशन**

- 1913 मध्ये रॉकफेलर यांनी US मध्ये स्थापन केली. भारतात 1920 पासून या संस्थेने कार्यास सुरुवात केली. डिसेंबर 1932 मध्ये भारतात कोलकाता येथे अखिल भारतीय स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य संस्था स्थापन करण्यासाठी रॉकफेलर फाउंडेशनने मदत केली.
  - 1979 मध्ये इटली येथे रॉकफेलर फाउंडेशन मार्फत एक प्राथमिक आरोग्यविषयक परिषद आयोजित करण्यात आली होती. आल्मा आटा घोषपत्रातील ध्येय अवास्तव असल्याने सदर परिषद आयोजित केली होती. या परिषदेतून या संकल्पनेचा उदय झाला. त्याद्वारे प्राथमिक आरोग्यविषयक जास्त महत्त्वाच्या समस्यांवर लक्ष्य केंद्रित करण्याचा दृष्टिकोन स्वीकारण्यात आला.

**Ford Foundation - 1936 मध्ये New York येथे स्थापना.**

- या संस्थेने भारताच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात वैद्यकीय सेवा व पायाभूत सुविधा पुरविण्याचे काम केले आहे. 1964 मध्ये या संस्थेच्या वतीने राष्ट्रीय आरोग्य प्रशासन व शिक्षण संस्था स्थापन करण्यात आली.

**Red Cross**

- 1864 मध्ये Henry Dunant यांनी जिनिव्हा येथे एक करार केला. पुढे 1919 मध्ये त्याची स्थापना झाली.
- भारतीय रेड क्रॉस सोसायटीची स्थापना 1920 मध्ये झाली. मुख्यालय नवी दिल्ली.

**महत्त्वाच्या वैद्यकीय संस्था**

- Central Council of Homeopathy, नवी दिल्ली (1973)
  - ही AYUSH अंतर्गत काम करणारी शिखर संस्था आहे.
- Central Council of Indian Medicine (1971)
  - आयुष प्रणालीचे पूर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम ठरवणे.
  - भारतीय औषध प्रणालीची नोंदवही राखणे व त्यात सुधारणा करणे.
- Homeopathic Pharmacopoeia Lab, Gaziabad (1975)

- ➢ होमिओपॅथिक औषधांची चाचणी व मानके ठरवणे.
- Pharmacopoeial Lab for Indian Medicine (गाझियाबाद) 1970
- जवाहरलाल पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था पुद्दुचेरी (JIPMER)
  - ➢ 1823 मध्ये फ्रेंच सरकारने स्थापन केलेल्या या संस्थेचे नामकरण धन्वंतरी मेडिकल कॉलेज व त्या कॉलेजचे नंतर रूपांतरण JIPMER मध्ये झाले.
- पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था (1960)
- अखिल भारतीय मूकबधिर संस्था, मैसूर (1966)
- National Institute of Mental Health and Neuro Sciences, बंगळुरु (1974)
- Lalram Swaroop Institute of TB and alied Sciences, New Delhi (1952)
- चित्तरंजन केंद्रीय कर्करोग संस्था, कोलकत्ता (1957)
- Indira Gandhi Institute of Health and Medical Sciences (शिलाँग) 1987.
- कस्तुरबा आरोग्य सोसायटी सेवाग्राम (1945)
- गोपनीय बारडोलाई मानसिक आरोग्य संस्था, तेजपूर (आसाम) 1876.
- भारतीय अन्नसुरक्षा माणके प्राधिकरण, दिल्ली (FSSAI) Aug 2011.
  - ➢ अन्नसुरक्षा आणि मानद अधिनियम 2006 अंतर्गत हे प्रधिकरण अस्तित्वात आले.
- राम मनोहर लोहिया हॉस्पिटल नवी दिल्ली
  - ➢ 1932 मध्ये ब्रिटिशांनी विलिंग्टन हॉस्पिटल स्थापन केले पुढे त्याचे नामांकरण राम मनोहर लोहिया हॉस्पिटल झाले.
- राजकुमारी अमृता कौर नर्सिंग विद्यालय, दिल्ली (1946)
- वर्धमान महावीर विद्यालय, दिल्ली (2001)
- Lady Hardinge Medical College 1916.
  - ➢ व्हॉईसरॉय चार्ल्स हार्डिंग्जच्या पत्नीने विद्यालय सुरू केले.
  - ➢ हे विद्यालय दिल्ली विद्यापीठाशी संलग्नित असून केवळ महिलांसाठी आहे.

**आरोग्यविषयक महत्त्वाच्या संस्था**

- Central Bureau of Health Intelligence 1964 – नवी दिल्ली
- महाराष्ट्र राज्य आयुष संचालनालय 1957– मुंबई
- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
  - ➢ 3 June 1998 नाशिक.
  - ➢ ब्रीदवाक्य – स्थास्थ्यरक्षणाय विज्ञानानुसन्धानाय समर्पित
  - ➢ महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ कायदा 1999 नुसार राज्यातील सर्व आरोग्य शिक्षण देणाऱ्या संस्था या विद्यापीठाशी संलग्नित आहेत.
- महाराष्ट्र Medical Council, 1965 मुंबई.
  - ➢ ही एक वैधानिक संस्था असून तिची स्थापना महाराष्ट्र वैद्यकीय परिषद कायदा 1905 नुसार झाली आहे.
  - ➢ 1912 मध्ये Bombay Medical Council स्थापना झाले होते. पुढे तिचेच महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत रुपांतर झाले.

**महाराष्ट्र राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग पुणे**

- आरोग्य प्रदर्शन, मेळावे यांचे आयोजन महाराष्ट्र आरोग्य पत्रीका या मासिकाचे प्रकाशन
- डॉ. आनंदीबाई या पुरस्काराची अंमलबजावणी करणे.
- परिवर्तन एक्सप्रेस फिरत्या वाहनामार्फत आरोग्य विषयक जनजागृती.
- P.C.P.N.D.T. Act संबंधी मंधुरा हा माहितीपट.

**देशातील काही महत्त्वपूर्ण वैद्यकीय संस्था**

- Tuberculosis Research Centre (क्षयरोग), चेन्नई.
- Vector Control Research Center, पाँडिचेरी.
- Maleria Research Center - New Delhi.
- Genetic Research Center - Mumbai.
- Central Institute for Leprocy - Aagra.
- National Institute for Virology - Pune.
- National AIDS Research Institute - Pune.
- National Institute of Nutrition - Hydrabad.
- National Institute of Cholero - Kolkata.
- National Institute for Research in Reproductive Health - Mumbai.
- National Institute for Occupational Health - Ahmadabad.
- Food & Drug Toxicology Research Center - Hydrabad.
- Institute of Pathology - New Delhi.
- Institute of Immuno Hematology - Mumbai.
- National Institute of Epidemiology - Chennai.
- Rajendra Prasad Medical Research Institute of Medical Science - Patana (काला आजार).
- Central Drug Testing Laboratory - कसौली.
- Central Drug Laboratory - कोलकाता.
- Central Health Education Bureau - नवी दिल्ली.
- Central Research Institute - कसौली.

- विवेकानंद योग अनुसंधान संस्थान – बंगळुरु.
- अली यावर जंग नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर हिअरिंग हॅन्डिकॅप्ड - मुंबई.
- Artificial Limbs Manufacturing Corporation of India - कानपूर.
- National Institute for Empowerment of Person with Multiple Disabilities - चेन्नई.
- Institute of Physical Handicaped - नवी दिल्ली.
- National Institute of Ortho Handicaped - कोलकाता.
- National Institute for Mentally Handicaped - देहराडून.
- National Institute of Public Co-operation & Child Development - नवी दिल्ली.
- National Institute of Rehabilitation Tranning & Research - कटक.
- फिलेरिया नियंत्रण प्रशिक्षण केंद्र – एर्नाकुलम.
- राष्ट्रीय कुष्ठरोग संस्था – बेंगलोर.